# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः05.04.2026** **वारः रविवार**

---

- **ईराणला होर्मुज सामुद्रधुनी उघडण्यासाठी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांचा 48 तासांचा अंतिम इशारा**
- **होर्मुझच्या सामुद्रधुनीतून एलपीजीवाहक सातवं भारतीय जहाज मार्गस्थ**
- **विधानसभेच्या निवडणुकीसाठी केरळमसह पुद्दुचेरी, पश्चिम बंगाल, तामिळनाडू आणि आसाममध्ये प्रचार शिगेला आणि**
- **'वर्ल्ड आर्चरी पॅरा सिरीज'मध्ये,भारतीय तिरंदाजांची 16 पदकांची कामगिरी**

**ट्रंपईराण**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी ईराणला होर्मुज सामुद्र धुनी उघडण्यासाठी 48 तासांचा अंतिम इशारा दिला आहे. ईराणकडे यासाठी आता केवळ 48 तासांचा अवधी असून त्यानंतर त्यांना गंभीर परिणामांना तोंड द्यावं लागेलं असं ट्रंप यांनी समाजमाध्यमावरील एका संदेशात म्हटलं आहे. युद्ध समाप्तीसाठी धोरणात्मक चर्चेच्या मुद्याचा पुनरुच्चार केला आहे. इराणने मात्र संघर्ष समाप्त करण्याचा अमेरिकेचा प्रस्ताव एकतर्फी असल्याचं सांगत नकार दिला आहे.

**सामुद्रधुनी**

पश्चिम आशियातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, भारतीय जहाज ‘ग्रीन सान्वी’नं, होर्मुझ सामुद्रधुनी पार केली असून हे जहाज मुंबईच्या दिशेनं रवाना झालं आहे. इराणनं होर्मुझच्या सामुद्रधुनीवर अनेक निर्बंध लादले असले तरी भारतीय ध्वज असलेल्या जहाजांना सुरक्षितपणे जाण्याची परवानगी दिली आहे. युद्ध सुरू झाल्यापासून गेल्या महिन्याभरात होर्मुझच्या सामुद्रधुनीतून प्रवास करणारं हे सातवं भारतीय जहाज आहे. त्यामध्ये 46 हजार 650 मेट्रिक टन LPG आणि 25 कर्मचारी आहेत. पर्शियन आखाताच्या प्रदेशात, चारशेहून अधिक भारतीय खलाशांसह एकंदर 17 भारतीय जहाजं आहेत. सागरी मालवाहतूक संचालनालय, जहाज मालक कंपन्या आणि परदेशातील भारतीय दूतावास यांच्या संपर्कात असून परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत.

या पार्श्वभूमीवर ,पेट्रोलियम आणि भूगर्भ वायू मंत्रालयानं देशभरात पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी सरकार सर्वतोपरी प्रयत्न करत असल्याचं म्हटलं आहे. नागरिकांनी पेट्रोल आणि डिझेलची घाबरून खरेदी करणं, तसंच एलपीजीचं अनावश्यक बुकिंग करणं टाळावं, असा सल्ला मंत्रालयानं दिला आहे.

**मासेमार**

सध्या सुरू असलेल्या पश्चिम आशिया संघर्षाच्या दरम्यान ईराणमध्ये अडकलेल्या एकंदर 345 भारतीय मासे मारांना काल संध्याकाळी  आर्मेनिया मार्गे सुरक्षितपणे चेन्नईमध्ये आणण्यात आलं.

हे अभियान , संघर्षग्रस्त भागातल्या भारतीय नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी भारताच्या सातत्य पूर्ण प्रयत्नांचा भाग असल्याचं परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे. इराणमध्ये अडकलेल्या भारतीयांच्या परतीसाठी आर्मेनीया  सतत सहकार्य करत असून त्यांच्या या सहकार्यासाठी परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी आर्मेनिया सरकारचे आभार मानले आहेत. ईराणमधून एकंदर 1 हजार 200 पेक्षा अधिक भारतीय नागरिकांना सुरक्षितपणे स्थलांतरित करण्यात आलं असून त्यापैकी 996 लोक आर्मेनियात पोहोचले असल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयानं दिली.

**प्रचारसभा**

केरळम विधानसभा निवडणुकीचा  प्रचार आता शिगेला पोहोचला असून काल विविध पक्षांच्या प्रमुख नेत्यांच्या सभा झाल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तिरुवल्ला इथं आयोजित प्रचारसभेला संबोधित केलं. महिला सबलीकरण हे राष्ट्रीय लोकशाही आघाडीचं मुख्य ध्येय असून सरकारच्या अनेक धोरणांमुळे महिलांचा मोठ्या प्रमाणात फायदा झाला आहे, असं ते यावेळी म्हणाले.

पुद्दुचेरीसह पश्चिम बंगाल, तामिळनाडू आणि आसाम मधेही आगामी विधानसभा निवडणुकांच्या प्रचाराला वेग आला असून विविध राजकीय पक्षांचे प्रमुख नेते जाहीरसभा, मेळावे आणि पथफेरीच्या माध्यमातून प्रचार करत आहेत.

आसाम, केरळ आणि पुद्दुचेरी मध्ये येत्या 9 एप्रिलला, तामिळनाडूमध्ये 23 एप्रिलला तर पश्चिम बंगालमध्ये 23 आणि 29 एप्रिल रोजी मतदान होणार आहे.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी अलपुझ्झा, इडुक्की आणि एर्नाकुलम इथं सभा घेतल्या. यावेळी त्यांनी डाव्या आघाडीवर आणि रालोआवर टीका केली.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस एम ए बेबी आणि सुभाषिनी अली यांनीही डाव्या आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी विविध मतदारसंघात सभा घेतली.

**भाजपावचननामा**

भारतीय जनता पक्षानं पुदुचेरी विधानसभेच्या निवडणुकीसाठी काल आपला वचननामा जाहीर केला. यामध्ये जनकल्याण आणि विकासासंबंधी उपाययोजनांची घोषणा करण्यात आली आहे. प्रमुख वचनांमध्ये सर्व रेशनकार्डधारकांना वर्षातून दोन मोफत LPG सिलेंडर महिला सक्षमीकरणासाठी पिंक ऑटो सुविधा, विद्यार्थ्यांसाठी ई-स्कूटर तसंच शेतकरी आणि मासेमारांना आर्थिक मदतीत वाढ करण्याचं नमूद केलं आहे.

**पंतप्रधानपश्चिमबंगाल**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज निवडणूक प्रचारासाठी पश्चिम बंगालमधल्या कुच बिहार इथं भेट देणार आहेत. कुच बिहार मधल्या रासमेळा मैदानात, ते कुच बिहार जिल्ह्यातल्या आठ जागांसाठी आणि अलिपुरद्वार जिल्ह्यातल्या पाच जागांसाठी भाजपच्या उमेदवारांच्या  समर्थनासाठी प्रचारात सहभागी होतील.

**भाजपा यादी**

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकांसाठी भारतीय जनता पार्टीनं 5 उमेदवारांची आपली पाचवी यादी जाहीर केली आहे. कल्याणी मतदारसंघातून अनुपम बिस्वास, उत्तर कृष्णनगर मधून तारकनाथ चटर्जी, उत्तर डम

डम मधून सौरव सिकदर, मध्यमग्राममधून  अनिंद्य राजू बॅनर्जी आणि उलूबेरिया पूर्व मतदान केंद्रातून रुद्रप्रसाद बॅनर्जी निवडणूक लढवतील. भाजपानं आपल्या मागील यादीतही काही बदल केले आहेत. आता, कौशिक सिद्धार्थ उत्तर बसीरहाट मधून, अभिजीत सरदार बिष्णुपूरमधून, आणि शंकर सिकदर बेहाळा पूर्व मतदार संघातून निवडणूक लढवणार आहेत.

**<u>निवडणूक आयोग</u>**

भारतीय निवडणूक आयोगानं पश्चिम बंगालमधल्या पनिहाटी विधानसभेच्या मतदारसंघाचे क्षेत्र सहाय्यक अतनु चक्रवर्ती यांना पदावरून काढून टाकले आहे. आयोगानं त्यांना कर्तव्यात दुर्लक्ष आणि अयोग्य वर्तनाबद्दल कारण दाखवा नोटीस जारी केली आहे. चक्रवर्तींच्या एका विशिष्ट पक्षासोबत राजकीय उपक्रमांमध्ये सहभाग असल्याच्या अहवालानंतर आयोगानं ही कारवाई केली.

दुसऱ्या एका घटनेत, मुर्शिदाबाद जिल्ह्यातल्या बाहरामपूरमधल्या प्रभारी निरीक्षकांविरुद्ध ही आयोगानं शिस्तभंग कारवाई सुरु केली आहे. याशिवाय, आयोगानं अशाच घटनांसंदर्भात तृणमूल काँग्रेसच्या चार नेत्यांविरुद्धही कारवाई सुरु केली आहे.

**<u>चेतकस्थापना</u>**

बीआरओ अर्थात सीमा रस्ते संघटनेच्या 'प्रकल्प चेतक'ने काल राजस्थानमधील बिकानेर मध्ये आपला 47 वा स्थापना दिवस साजरा केला. या निमित्ताने, पश्चिम क्षेत्रातल्या सामरिकदृष्ट्या महत्त्वाच्या प्रदेशांमध्ये केलेल्या चार दशकांहून अधिक काळातील समर्पित सेवेचा गौरव करण्यात आला. या प्रकल्पाने राजस्थान, पंजाब आणि गुजरातच्या उत्तरेकडील भागांमध्ये पायाभूत सुविधांचा विकास आणि त्यांची देखभाल करण्यात भूमिका बजावली असल्याचं संरक्षण मंत्रालयाने एका निवेदनात म्हटले आहे.

**<u>यूजीसी</u>**

विद्यापीठ अनुदान आयोगाकडून  'QS म्हणजेच क्वाक्वेरेली सायमंड्स जागतिक क्रमवारी 2027' साठी माहिती सादर करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. क्वाक्वेरेली सायमंड्स ही विद्यापीठांची जागतिक क्रमवारी करणारी संस्था असून UGC ने सर्व पात्र उच्च शिक्षण संस्थांना जागतिक क्रमवारीमध्ये योग्य प्रतिनिधित्व मिळवण्यासाठी सर्व प्रकारची आवश्यक माहिती 12 एप्रिलपूर्वी 'QS Hub Portal' द्वारे सादर करण्याची विनंती केली आहे.

**<u>राष्ट्रपतीईस्टर</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांनी ख्रिस्ती बांधवांना ईस्टरच्या शुभेच्छा दिल्या आहेत. प्रभू येशू ख्रिस्ताच्या पुनरुज्जीवनाचा हा दिवस आपल्याला करुणा आणि मानवतेची मूल्ये अंगीकारण्याची प्रेरणा देतो असं सांगत त्यांनी नागरिकांना उज्वल भविष्यासाठी सुसंवाद, शांतता आणि बंधुत्व वाढवण्याचा निर्धार करण्याचं आवाहन केलं.

**<u>लद्दाख-बर्फ</u>**

लडाखच्या अनेक भागात होत असलेल्या हिमवर्षावामुळे याठिकाणी भेट देणाऱ्या पर्यटकांचा उत्साह वाढला आहे. इथल्या विविध भागात होणारी विविध रंगांच्या फुलांची उधळण बघण्यासाठी पर्यटक गर्दी करतात.

**हवामान**

येत्या 2 दिवसांत झारखंड मध्ये गारांच्या पावसासह वादळी वारे वाहण्याचा इशारा हवामन विभागांनं दिला आहे. तर अरुणाचल प्रदेश, असम, मेघालय, केरळम, तमिलनाडु, पुद्दुचेरी आणि कराईकल मध्ये मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. उत्तराखंड, बिहार, छत्तीसगढ़, ओडिशा, विदर्भ, पश्चिम बंगाल, मध्य प्रदेश, मराठवाड़ा याठिकाणीही येत्या 2 दिवसांत मुसळधार पावसाची शक्यता आहे.

**महाराष्ट्रपाऊस**

महाराष्ट्रातल्या अनेक जिल्ह्यांमध्ये अवकाळी पाऊस, गारपीट आणि वादळी वाऱ्यांमुळे पिकांचं आणि शेतकऱ्यांचं मोठं नुकसान झालं आहे. सुकवण्यासाठी ठेवलेली हळद आणि कांद्याचं पिक यामध्ये प्रभावित झाल्यानं ज्यामुळे गुणवत्ता आणि बाजारभावाबाबत शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. सततच्या पावसानं ज्वारी, मका, गहू , फळं आणि भाजीपाला याचं ही नुकसान होत आहे. राज्याचे विपणन मंत्री जयकुमार रावल यांनी प्रभावित शेतकऱ्यांसोबत सरकार ठाम उभे असल्याचे आश्वासन दिले. धुळे जिल्ह्यातील गावांना भेट देताना त्यांनी शेतकऱ्यांना वेळेत मदत मिळण्यासाठी, अधिकाऱ्यांना या नुकसानाची तातडीने आणि पारदर्शक पाहणी करण्याचे आदेश दिले.

**तिरंदाजी**

बँकॉकमध्ये पार पडलेल्या 'वर्ल्ड आर्चरी पॅरा सिरीज'मध्ये, दोन्ही हात आणि दोन्ही पाय गमावलेल्या अठरा वर्षीय तिरंदाज पायल नाग हिनं, 'कंपाउंड महिला' गटाच्या अंतिम फेरीत जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर असलेल्या शीतल देवीचा अंतिम फेरीत पराभव करत सुवर्णपदक पटकावलं. या स्पर्धेत भारतानं 7 सुवर्ण, 5 रौप्य आणि 4 कास्य पदकांसह 16 पदकं जिंकून आपल्या मोहिमेची सांगता केली.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार.